जा.क्र.औद्यो/१६-सआ/औ.स.सं./नोंदणी निकष/२०१७
सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय.
दिनांक ०४/१०/२०१७

-: परिपत्रक -:

**विषय :- औद्योगिक सहकारी संस्था नोंदणीबाबत.**

सद्यस्थितीतऔद्योगिक सहकारी संस्थांचा आढावा घेतला असता ४०४१ एवढया संस्था नोंदणीकृत आहेत. संस्थांची नोंदणी करताना सन १९८५ नंतर निकष तयार केलेले दिसून येत नाहीत. शासनाच्या वेगवेगळया विभागांकडून औद्योगिक सहकारी संस्थांना मोठया प्रमाणात अर्थसहाय्य उपलब्ध होत असल्याने अशा संस्था नोंदणी होण्याचे कार्यक्षेत्र वाढीचे प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालये आणि या कार्यालयास दाखल होत आहेत. राज्य/ केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य प्राप्त झालेल्या संस्थांचे वैधानिक लेखापरिक्षण होणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी क्षेत्रीय स्तरांवरीलन निबंधकांनी खबरदारी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे संस्था नोंदणी होताना प्रकल्प अहवाल शासनाच्या विविध यंत्रणाकडून तपासून अर्थक्षम होत असतील तरच नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व प्रकारच्या औद्योगिक सहकारी संस्थांचे नोंदणी विषयक निकष खालील प्रमाणे ठरविण्यात येत आहेत.

१) भाग भांडवल.

| कार्यक्षेत्र | भाग भांडवल रक्कम | |
|---|---|---|
| | सर्वसाधारण | मागासवर्गीय |
| गाव पातळी | रू.१,०२,०००/- अथवा प्रकल्प किंमतीच्या १/१० इतकी रक्कम यापैकी जास्त असेल ती रक्कम | रू.५१,०००/- अथवा प्रकल्प किंमतीच्या १/१० इतकी रक्कम यापैकी जास्त असेल ती रक्कम |
| तालुका पातळी | रू. ३,०२,०००/- अथवा प्रकल्प किंमतीच्या १/१० इतकी रक्कम यापैकी जास्त असेल ती रक्कम | रू.१,५१,०००/- अथवा प्रकल्प किंमतीच्या १/१० इतकी रक्कम यापैकी जास्त असेल ती रक्कम |

२) सभासद संख्या.

| कार्यक्षेत्र | सर्वसाधारण | | मागासवर्गीय | |
|---|---|---|---|---|
| | सभासद संख्या | सभासद भाग रक्कम | सभासद संख्या | सभासद भाग रक्कम |
| गाव पातळी | ५१ | २,००० | ५१ | १,००० |
| तालुका पातळी | १५१ | २,००० | १५१ | १,००० |

३) सभासदत्वाबाबत -

१) एका व्यक्तीस एकाच औद्योगिक सहकारी संस्थेमध्ये सभासद होता येईल व प्रत्येक सभासद संस्थेच्या कार्यक्षेत्रातील असावा. तसे नोंदणीकृत निवासाच्या पुराव्यासह सादर करणे आवश्यक आहे. एकच व्यक्ती एका व्यतिरिक्त जास्त औद्योगिक सहकारी संस्थेची सभासद आढळून आल्यास त्या व्यक्तीचे नंतर झालेल्या संस्थेतील सभासदत्व आपोआप रद्द होईल.

२) प्रत्येक संस्थेतील ९०% सभासद कारागीर असले पाहिजेत यापैकी किमान १०% सभासद शासन मान्यताप्राप्त संस्थेतील प्रशिक्षित असले पाहिजेत.

४) रहिवासी दाखल्याबाबत - प्रत्येक सभासदाने तहसिलदार यांनी प्रमाणित केलेला रहिवासी दाखला प्राप्त करून सादर करणे आवश्यक आहे.

५) जागेबाबत- संस्थेच्या कार्यालयासाठी किंवा कार्यशाळेच्या जागेसाठी जागेच्या घरमालकाकडून जागा भाडयाने अगर मालकी हक्काने देण्याबाबतचे लेखी पत्र रू.२००/- च्या स्टॅम्पवर घ्यावे सदर पत्र नोंदणीकृत असावे.

६) कार्यक्षेत्र - प्रत्येक संस्थेचे कार्यक्षेत्र गांव अथवा तालुका पातळीपुरते मर्यादित राहील.

७) ना हरकत प्रमाणपत्र- एकाच उद्देशाच्या (समान उत्पादन घेणाऱ्या ) दोन संस्था एकाच तालुक्यात नोंदणी करता येणार नाहीत. तथापि तशी नोंदणी करावयाची झाल्यास त्या कार्यक्षेत्रातील तशाच उद्देशाच्या (समान उत्पादन घेणाऱ्या ) संस्थांचे ना हरकत प्रमाणपत्र संस्थेवर बंधनकारक राहील. प्रकल्पास असलेला वाव पाहता निबंधकांना ना हरकत प्रमाणपत्राशिवाय निर्णय घेता येईल.

८) नोंदणी रद्द करणेबाबत - नोंदणी झालेपासून एक वर्षाच्या आत संस्थेने उद्देशाप्रमाणे कामकाजास सुरूवात न केल्यास संस्थेची नोंदणी रद्द करण्यात येईल.

९) प्रकल्पास तांत्रिक प्रमाणपत्र - मिटकॉन / सिकॉम / जिल्हा उद्योग केंद यांचेकडून प्रकल्प तांत्रिकदृष्टया / आर्थिकदृष्टया सक्षम / योग्य असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१०) नोंदणीपूर्व छाननी - संस्था आर्थिकदृष्टया सक्षम होईल याची नोंदणी अधिकारी यांनी नोंदणीपुर्व छाननी करून घेणे आवश्यक आहे.

११) कार्यक्षेत्र वाढीबाबत- संस्थेस पुढील अटींच्या अधिन राहून प्रत्येक स्तरावर (क्रमशः गांव, तालुका, जिल्हा, विभाग,राज्य ) कार्यक्षेत्रवाढ देण्यात येईल.

१) लगतचे ३ वर्षे संस्थेचा लेखापरिक्षण वर्ग सातत्याने " अ " असावा

२) संस्थेचे उद्देशाप्रमाणे आणि प्रकल्प अहवालाप्रमाणे उत्पादन सुरू झालेले असले पाहीजे आणि त्याबाबत मागील लगतच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालात उत्पादन व विक्रीबाबत समाधानकारक आर्थिक आकडेवारी सिध्द झालेली पाहिजे.

३) लगतचे ३ वर्ष संस्था सातत्याने नफ्यात असावी.

४) संस्थेस शासकीय भाग भांडवल प्राप्त असल्यास भाग भांडवल परतफेड निधी उभारलेला असावा.

५) कार्यक्षेत्र वाढीबाबतचे संस्थांचे प्रस्ताव विचारात घेताना गाव पातळीवरील संस्थेस तालुका कार्यक्षेत्रवाढ, तालुका कार्यक्षेत्र असलेल्या संस्थेस जिल्हा कार्यक्षेत्रवाढ देता येईल. गाव पातळीवरील संस्थेस थेट जिल्हा कार्यक्षेत्रवाढ किंवा तालुका कार्यक्षेत्र असलेल्या संस्थेस थेट विभागाचे कार्यक्षेत्र देता येणार नाही.

६) जिल्हा कार्यक्षेत्रवाढीचे प्रस्ताव तालुका सहाय्यक निबंधक यांचे मार्फत, विभाग किंवा शेजारील जिल्हा कार्यक्षेत्र वाढीचे प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक यांचे मार्फत तर एकापेक्षा अधिक विभागाचे प्रस्ताव विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था यांचे मार्फत सादर केले जातील.

१२) विपणन - विपणन संस्थांबाबत त्यांना पणन / विपणन कार्यक्षेत्राचे बंधन राहणार नाही.

१३) औद्योगिक सहकारी संस्थेने त्यांचे सभासदांची नोंद वही ठेवावी. नोंद वहीमध्ये सभासदांची नावे त्यांचे आधारकार्ड क्रमांक / मतदान क्रमांक, बँकेचे नाव व खाते क्रमांक या माहितीचा समावेश असावा.

१४) औद्योगिक सहकारी संस्थेने सभासदांची कामाबद्दलची मजुरी त्यांचे बँक खात्यात धनादेश/ इलेक्ट्रानिक क्लिअरन्स व्दारे जमा करावी.

उपरोक्त विषयाची यापुर्वी निर्गमित झालेली सर्व परिपत्रके रद्द करण्यात येत आहेत.

(डॉ.विजय ना.झाडे)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकरी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.